( **इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णयाचा मराठी भाषेत अनुवाद** )

**[१९९६] ३ एस. सी. आर. १०४२**

टी. वेंकट नारायण आणि इतर

- विरुद्ध -

श्रीमती. वेंकट सुब्बम्मा (मृत) आणि इतर.

२९ मार्च, १९९६

[ के. रामास्वामी आणि जी. बी. पट्टनायक, न्या. न्या.]

साक्षीपुरावा अधिनियम, १८७२ :

कलम ६५ - दुय्यम साक्षीपुरावा - मालमत्तेचे अन्यसंक्रामित करण्यापासून प्रतिवादीस निरुद्ध करण्यासाठी वादी द्वारा व्यादेशाबाबतचा दावा - दावा मालमत्ता हे पूर्वीच्या दाव्यात पक्षकारांमधील तडजोड हुकूमनाम्याखाली मिळालेली तिची अबाधित संपदा असल्याचा दावा प्रतिवादी करीत आहे - दावा प्रलंबित असताना, प्रतिवादीचा मृत्यू झाला - कायदेशीर प्रतिनिधींना अभिलेखावर आणण्यात आले आणि त्यांनी प्रतिवादींद्वारा निष्पादित करण्यात आलेली आहे असे अभिकथित असलेल्या मृत्युपत्राच्याखाली मालमत्तेकरता दावा केला - त्यांनी मूळ मृत्युपत्र हरविले आहे असे अभिकथित केला आणि दुय्यम साक्षीपुरावा दाखल करण्याचा प्रयत्न केला - न्यायचौकशी न्यायालयाने दुय्यम पुरावा दाखल करण्यास परवानगी नाकारली - उच्च न्यायालयाने दुय्यम साक्षीपुरावा दाखल करण्यास अनुज्ञा दिली - प्रतिवादीद्वारा निष्पादित करण्यात आले आहे असे अभिकथित असलेले मृत्यूपत्र शाबीत करण्यासाठी व्यादेशाबाबतच्या दाव्यात दुय्यम साक्षीपुरावा दाखल करण्यास अनुज्ञा देण्याचे निर्देश देण्यात उच्च न्यायालयाने विधिविषयक आणि अधिकारिताविषयक चूक केली असा निर्णय दिला - तडजोड हुकूमनाम्याचा परिणाम प्रलंबित दाव्याची विषयवस्तू आहे - त्याखाली प्रतिवादीला जे कोणतेही हक्क उपलब्ध होते ते हक्क कायदेशीर प्रतिनिधींना उपलब्ध होतील - उत्तरवादीला,

मृत्यूपत्राखाली तिचे हक्क, जर काही असल्यास, सिद्ध करण्याची मुभा असेल - परंतु दाव्यातील न्यायचौकशी ही तडजोड हुकूमनाम्याच्या निर्वचनापुरती मर्यादित राहील.

दिवाणी अपील अधिकारिता : दिवाणी अपील क्रं.. ७१०७/१९९६.

दिवाणी पुनरिक्षण याचिका क्रं. १९३५/१९९२ मध्ये आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाने दिलेला न्यायनिर्णय व आदेश यातून.

अपीलकर्त्यांसाठी : सुश्री. गुणवंत दारा आणि पी. गौर.

उत्तरवादींसाठी : पी. एस. नरसिम्हा आणि व्ही. जी. प्रगसाम.

न्यायालयाचा खालील आदेश देण्यात आला :

अनुज्ञा देण्यात आली.

आम्ही दोन्ही बाजूंच्या वतीने काउन्सेल यांचे म्हणणे ऐकले आहे.

टी. रमेशचंद्र चौधरी आणि त्याची आई श्रीमती. टी. वेंकट सुब्बम्मा यांच्यामध्ये वाटणीबाबत त्यांच्यात असलेल्या दाव्यात तडजोड झाली होती हे सर्वमान्य आहे. जिल्हा न्यायालय, खम्मम यांच्याद्वारे दिनांक २८ ऑगस्ट, १९६१ रोजी तडजोड हुकूमनामा पारित करण्यात आला. असे दिसून येईल की त्यानंतर जेव्हा श्रीमती. वेंकट सुब्बाम्मा हिने तडजोड हुकूमनाम्यानुसार तिला देण्यात आलेल्या मालमत्ता अंत्यसंक्रामित करण्याचा प्रयत्न केला, तेव्हा अपीलकर्त्यानी मालमत्ता अंत्यसंक्रामित करण्यापासून तिला निरुद्ध करण्यासाठी निरंतर व्यादेशाकरता खम्मम येथील जिल्हा मुन्सीफ न्यायालयात ओ. एस. क्रं. ३१३/८९ दाखल केला. वेंकट सुब्बमा हिला तडजोड हुकुमनाम्याखाली अबाधित संपदा मिळाली, जेणे करून तिला त्रयस्थ पक्षकारांना मालमत्ता अंत्यसंक्रामित करता येईल किंवा तिच्याकडे हिंदू उत्तराधिकार अधिनियम, १९५६ च्या कलम १४(२)

नुसार समावेश केलेली, त्या खालील मर्यादित संपदा होती किंवा कसे, या प्रश्नाभोवती दाव्यातील वादास्पद बाब फिरते. दावा प्रलंबित असताना, तिचा मृत्य झाला. दिवाणी प्रकिया संहिता, आदेश २२, नियम ४ नुसार, उत्तरवादी अभिलेखावर आलेले आहेत आणि तिने दावा केला की वेंकट सुब्बामने तिच्या बाजूने मृत्यूपत्र निष्पादित केले होते. आणखी असा युक्तिवाद सुद्धा करण्यात आला की तिच्याकडून मूळ मृत्यूपत्र  हरविले आणि साक्षीपुरावा अधिनियमाच्या कलम ६५ नुसार दुय्यम साक्षीपुरावा दाखल करण्याचा प्रयत्न केला. जिल्हा मुन्सिफ न्यायालयाने तिला दुय्यम साक्षीपुरावा दाखल करण्याची परवानगी नाकारली. त्यानंतर प्रकरणाच्या संबंधाने पुनरिक्षण याचिका दाखल करण्यात आली. आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाने, दिवाणी पुनरिक्षण याचिका क्रं. १८३५/९२ मध्ये दिलेल्या आक्षेपित आदेश, दिनांक ५ नोव्हेंबर, १९९३ द्वारे, दुय्यम साक्षीपुरावा दाखल करण्याचे निर्देश दिले. अशा तऱ्हेने विशेष अनुज्ञेद्वारे हे अपील.

एकमेव प्रश्न आहे तो म्हणजे : वेंकट सुब्बम्माने तिच्या बाजूने निष्पादित केले असल्याचे म्हणण्यात आलेले अभिकथित मृत्युपत्र शाबीत करण्यासाठी दुय्यम साक्षीपुरावा दाखल करण्यास उत्तरवादी हक्कदार आहे किंवा कसे? मान्य केलेली स्थिती अशी आहे की वाटणीबाबतच्या दाव्यात, उत्तराधिकारी अधिनियम अंमलात आल्यानंतर, म्हणजे, २८ ऑगस्ट, १९६९ रोजी, वेंकट सुब्बम्माने तिच्या मुलाशी तडजोड केली होती आणि त्यात अंतर्भूत असलेल्या प्रसंविदेसह हुकूमनामा मिळविला. त्या हुकूमनाम्याचा परिणाम काय आहे हे प्रलंबित दाव्यातील विषयवस्तू आहे. त्याखाली तिला जे काही हक्क उपलब्ध होते ते हक्क कायदेशीर प्रतिनिधी म्हणून अभिलेखावर आलेल्या उत्तरवादीला उपलब्ध होतील. केवळ व्यादेशाबाबतच्या दाव्याचे रूपांतर, ज्यामध्ये मृत्यूपत्र शाबीत करावयाचे आहे, मृत्यूपत्र शाबीत करण्याबाबतच्या दाव्यामध्ये होऊ शकत नाही. जर मृत्यूपत्र हे कायद्यानुसार शाबीत करावयाचे असेल, तर ते भारतीय उत्तराधिकार अधिनियमाखाली उपबंधित केलेल्या

कार्यपद्धतीनुसार क्षमता व अधिकारिता असलेल्या न्यायालयात मृत्यूपत्रप्रमाण म्हणून असावयास हवे. ती कार्यपद्धति मृत्यूपत्रप्रमाण दावा म्हणून केवळ व्यादेशाबाबतच्या दाव्यात रुपांतरीत करता येऊ शकणार नाही आणि परिस्थितीनुसार आवश्यक असलेला साक्षीपुरावा, मग तो मूलभूत असो किंवा दुय्यम साक्षीपुरावा असो, दाखल करण्यासाठी पक्षकारांना निर्देश देऊ शकत नाही. वेंकट सुब्बम्माने निष्पादित केले असल्याचे अभिकथित केलेले मृत्युपत्र शाबीत करण्यासाठी व्यादेशाबाबतच्या दाव्यात दुय्यम पुरावा दाखल करण्याचे निर्देश देण्यामध्ये उच्च न्यायालयाने विधिविषयक आणि अधिकारिताविषयक चूक केलेली आहे.

तदनुसार, अपील अनुमत करण्यात येते. उच्च न्यायालयाचा आदेश रद्द करण्यात येतो आणि जिल्हा मुन्सिफ यांचा आदेश कायम करण्यात येतो. उत्तरवादीला मृत्युपत्राखाली तिचे हक्क, जर काही असल्यास, कायद्यानुसार शाबीत करण्याची मुभा राहील, परंतु दाव्यातील न्यायचौकशी, आधी नमूद केल्याप्रमाणे, तडजोड हुकूमनाम्याच्या निर्वचनापुरती मर्यादित राहील. वाद खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.

अपील अनुमत.

**अस्वीकरण**

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरीता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.